# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:24.10.2025** **वार:शुक्रवार**

1. 17 व्या रोजगार मेळाव्यात आज 51 हजार उमेदवारांना नियुक्तीपत्रं दिली जाणार
2. सशस्त्र दलांची क्षमता वाढवण्यासाठी 79, हजार कोटींच्या प्रस्तावांना संरक्षण अधिग्रहण परिषदेची मंजुरी
3. भाऊबीजेचा सण राज्यभरात पारंपरिक उत्साहात विविध उपक्रमांद्वारे साजरा आणि
4. आयसीसी महिला विश्वचषक क्रिकेटमध्ये भारतीय संघ उपांत्य फेरीत दाखल, तर पुरुषांच्या क्रिकेटमध्ये ऑस्ट्रेलियाची मालिकेत विजयी आघाडी

**पंतप्रधान-रोजगार मेळा**

देशस्तरीय रोजगार मेळ्याच्या 17 व्या टप्प्यामध्ये आज पंतप्रधान नरेंद्र मोदी देशभरातील 40 ठिकाणी 51 हजारांहून अधिक उमेदवारांना नियुक्ती पत्रांचं वाटप करणार आहेत. या कार्यक्रमात पंतप्रधान नवनियुक्त उमेदवारांना संबोधितही करणार आहेत. याअंतर्गत मुंबईत केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांच्या उपस्थितीत, तर पुण्यात केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या उपस्थितीत उमेदवारांना नियुक्तीपत्रांचं वाटप करण्यात येणार आहे.

**संरक्षण-खरेदी**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संरक्षण अधिग्रहण परिषदेच्या बैठकीत काल सशस्त्र दलांच्या क्षमता वाढविण्यासाठी सुमारे एकोणनव्वद हजार कोटी रुपयांच्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. लष्करासाठी नाग क्षेपणास्त्र प्रणाली, जमिनीवर आधारित मोबाइल (ELINT) इ–लिंट प्रणाली आणि मटेरियल हँडलिंग क्रेनसह हाय-स्पीड वाहनांच्या खरेदीचा यात समावेश असल्याचं संरक्षण मंत्रालयानं सांगितलं. नौदलासाठी, लँडिंग प्लॅटफॉर्म डॉक, पृष्ठभागावरील 30 मिलिमीटर तोफा, प्रगत हलक्या वजनाचे टॉर्पेडो, इलेक्ट्रो-ऑप्टिकल इन्फ्रा-रेड सर्च अँड ट्रॅक सिस्टीम आणि 76 मिलिमीटर सुपर रॅपिड गन माउंटसाठी स्मार्ट दारूगोळा खरेदीलाही मान्यता देण्यात आली. दरम्यान, संरक्षण मंत्र्यांनी काल नवी दिल्लीत संरक्षण खरेदी नियम 2025 प्रकाशित केले. 1 नोव्हेंबरपासून लागू होणाऱ्या नवीन नियमांमुळं तीनही सेवा आणि संरक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या इतर आस्थापनांना सुमारे 1 लाख कोटी रुपयांची महसूल खरेदी करता येईल.

**मिहान**

मिहान आर्थिक क्षेत्रात सोलर डिफेंस अँड एरोस्पेस ही भारतातील अग्रगण्य उत्पादक कंपनी 233 एकर क्षेत्रात अत्याधुनिक संरक्षण आणि एरोस्पेस उत्पादनाचे प्रकल्प उभारणार आहे. या प्रकल्पासाठी मिहानतर्फे 233 एकर भूखंडाचं वाटप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते काल करण्यात आलं. मिहान प्रकल्पातील हे आजवरच्या सर्वात मोठ्या भूखंडाचं वितरण असून यावेळी कंपनीचे अध्यक्ष सत्यनारायण नुवाल यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. सोलर डिफेन्स अँड एरोस्पेस कंपनी राज्यात 12 हजार 80 कोटी रुपयांची गुंतवणूक करुन अत्याधुनिक संरक्षण आणि एरोस्पेस उत्पादन प्रकल्प उभारणार आहे. या प्रकल्पामुळं 6 हजार 800 प्रत्यक्ष रोजगार निर्मिती होणार आहे. तसंच ही कंपनी मिहान आर्थिक क्षेत्रात 680 कोटी रुपयांची अतिरिक्त गुंतवणूक करुन विमान आणि संरक्षण उपकरण निर्मिती केंद्रही स्थापन करणार आहे.

**जाजू-अकोला**

केंद्रीय माहिती प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांनी काल अकोला आकाशवाणी केंद्राला भेट देऊन तिथल्या कामकाजाचा आढावा घेतला. या केंद्रावरुन प्रसारित होणाऱ्या किसानवाणी, लोकसंगीत यासह विविध कार्यक्रमांची माहिती

घेतली. अकोला आकाशवाणीच्या माध्यमातून स्थानिक जाहिरात संकलनाच्या कार्याला गती द्यावी, प्रेरणादायी कार्यक्रमाची निर्मिती करावी, बहुजन हिताय बहुजन सुखाय ब्रीद सार्थकी ठरवावं असे निर्देश केंद्राच्या अधिकाऱ्यांना दिले.

**डीपफेक**

केंद्र सरकारनं माहिती तंत्रज्ञान नियमांमध्ये बदल प्रस्तावित केले आहेत. त्यानुसार कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून तयार केलेल्या सामग्रीचं स्पष्ट लेबलिंग अनिवार्य करण्यात आलं आहे. डीपफेक आणि चुकीच्या माहितीमुळे होणारं नुकसान रोखण्यासाठी फेसबुक आणि यूट्यूबसारख्या मोठ्या मंचांसाठी वाढीव जबाबदारी देखील या बदलांमध्ये समाविष्ट आहे. एक वृत्तांत...

**इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयानं डीपफेक ऑडिओ आणि व्हिडिओ आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर फिरणारी दिशाभूल करणारी सामग्री लक्षणीय नुकसान करू शकते असा इशारा दिला आहे. अशी माहिती प्रतिष्ठेला हानी पोहोचवू शकते, निवडणुकांवर प्रभाव टाकू शकते आणि आर्थिक फसवणूक करू शकते. माहिती तंत्रज्ञान नियम 2021 मधील प्रस्तावित सुधारणांमुळे चुकीच्या माहितीच्या स्रोताचा शोध घेण्यासाठी आणि जबाबदारी निश्चित करण्याकरिता स्पष्ट कायदेशीर आधार मिळणार आहे. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयानं या सुधारणांच्या मसुद्यावर संबंधितांकडून अभिप्राय मागितला आहे. पुढील महिन्याच्या 6 तारखेपर्यंत संबंधितांना आपला अभिप्राय IT Rules.consultation@meity.gov.in या ईमेल पत्त्यावर पाठविता येईल.**

**भाऊबीज**

दिपावलीच्या पर्वातील भाऊबीजेचा सण काल राज्यभरात पारंपरिक उत्साहात साजरा करण्यात आला. बहीण-भावाच्या अतूट स्नेहाचं प्रतीक असलेल्या या सणानिमित्त बहिणींनी आपल्या भावांचं औक्षण करुन त्यांच्या दीर्घायुष्याची कामना केली तर भावांनी त्यांच्या निरंतर संरक्षणाचं वचन देत त्यांना विविध भेटवस्तू प्रदान केल्या. राज्यात विविध ठिकाणी भाऊबीजेनिमित्त आयोजित कार्यक्रमांवर आधारित हा वृत्तांत...

**दिवाळीच्या सणादरम्यानही अहोरात्र सेवा बजावणाऱ्या अग्निशामक दलाच्या जवानांसाठी पुण्याच्या भोई प्रतिष्ठानद्वारे काल भाऊबीज कार्यक्रमाद्वारे कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. बहिणींचं हे प्रेम अनमोल ठेवा असल्याची भावना मुख्य अग्निशमन अधिकारी देवेंद्र पोटफोडे यांनी व्यक्त केली. गेली तीस वर्षे प्रतिष्ठानद्वारे हा कार्यक्रम आयोजित केला जातो. काल याप्रसंगी केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.**

**परभणी जिल्ह्यातील पालम तालुक्यातील चाटोरी परिसरातील भारतीय सैन्यात सेवारत असलेल्या 30 सैनिकांसह कुटुंबियांचा कृतज्ञता सोहळा आयोजित करण्यात आला. सैनिक कृतज्ञता कार्यक्रम मागील पाच वर्षांपासून विविध गावात जाऊन आयोजित केला जातो. त्यांना मानपत्र, शाल, मान्यवरांच्या हस्ते देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.**

**बुलढाणा जिल्ह्यातील देऊळगावराजा तालुक्यातील निमगाव गुरु या गावचे संतोष आणि अरुण धारे यांनी भाऊबीजेनिमीत्त आपल्या बहिणीला संविधानाच्या प्रास्ताविकेची प्रतिमा भेट दिली. संतोष धारे मागील 5 वर्षांपासून संविधानाच्या प्रास्ताविकेच्या प्रतिमा इतरांना भेट देत आहेत. चिखली विधानसभा मतदारसंघाच्या आमदार श्वेता महाले पाटील यांनी भाऊबीजेच्या निमित्तानं मतदारसंघातील सर्व बंधूंचं औक्षण करून त्यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या.**

**यवतमाळ जिल्ह्यात पुसद इथं माणुसकीची भिंत यांच्या वतीनं बेघर, निराधार, दिव्यांग, असहाय, वृद्ध आणि अनाथांसोबत भाऊबीज साजरी करण्यात आली. गोरगरीबांची स्वच्छता, सजावट, ओवाळणी करून सर्वांना भोजन देण्यात आलं. गेल्या 9 वर्षांपासून माणुसकीची भिंतद्वारे हा उपक्रम सुरु आहे.**

**अहिल्यानगर शहरातील शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या वतीनं दीपावली काव्यसंधेचे आयोजन करण्यात आलं. प्राध्यापक चंद्रकांत कर्डक अध्यक्षस्थानी होते. यावेळी अनेक कवींनी आपल्या कविता सादर केल्या. आकाशवाणी बातम्यांसाठी, आमच्या बातमीदारांसह मनोज क्षीरसागर, पुणे.**

**सरदार-नंदुरबार**

देशाचे पहिले गृहमंत्री लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त नंदुरबार जिल्ह्यातल्या शहादा शहरातून सरदार सन्मान यात्रेला काल सुरवात झाली. 28 ऑक्टोंबरपर्यत नंदुरबार जिल्ह्यातल्या 120 पेक्षा जास्त गाव-खेड्यांमध्ये भ्रमंती करुन ही यात्रा एकता, स्वाभिमान आणि राष्ट्रसेवेचा संदेश देणार आहे.

**महिला-क्रिकेट**

आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत काल रात्री नवी मुंबईत झालेल्या सामन्यात न्यूझीलंडचा 53 धावांनी पराभव करून भारतानं उपांत्य फेरीत प्रवेश केला. प्रथम फलंदाजी करताना, भारतीय सलामीवीर प्रतीका रावल आणि स्मृती मानधना यांनी शानदार शतकं ठोकत 49 षटकांत 3 बाद 340 धावांपर्यंत मजल मारली. मानधनानं 109 तर रावलनं 122 धावा केल्या. या दोघींनी महिला विश्वचषकाच्या इतिहासात भारतासाठी सर्वाधिक 212 धावांची विक्रमी सलामी भागीदारी केली.

पावसामुळं न्यूझीलंडसाठी सामना 44 षटकांचा करण्यात आला. त्यामुळं सुधारित 325 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, न्यूझीलंडनं 44 षटकांत 8 बाद 271 धावा केल्या, यामध्ये ब्रुक हॅलिडेने सर्वाधिक 81 धावा केल्या. या विजयासह, भारतीय महिला संघाचे आता तीन विजयांमधून सहा गुण झाले आहेत आणि ऑस्ट्रेलिया, इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिकेच्या बरोबरीनं त्या उपांत्य फेरीत पोहोचल्या आहेत.

**पुरुष-क्रिकेट**

ऑस्ट्रेलियात सुरु असलेल्या पन्नास षटकांच्या क्रिकेट मालिकेत काल यजमान संघानं भारताविरुद्ध दुसरा सामना दोन गडी राखून जिंकला आणि मालिकेत विजयी आघाडी घेतली. प्रथम फलंदाजी करताना भारताच्या 9 बाद 264 धावा झाल्या. ऑस्ट्रेलियानं सत्तेचाळीसाव्या षटकात हे लक्ष्य पूर्ण केलं.

**हवामान**

पुणे आणि रत्नागिरीत काल संध्याकाळी पावसाच्या जोरदार सरी कोसळल्या. कोकण आणि मध्य महाराष्ट्र तसंच मराठवाड्यात तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि वीजांसह मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. विदर्भातही गडगडाटी पावसाची शक्यता आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.